# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/09/2023 (बुधवार) दुपार


---

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. मौदा :–** दिनांक ०४/०९/२०२३ चे ०९.०० वा. ते १७.०० वा. सुमारास पो.स्टे. मौदा हद्यीत फिर्यादी यांची अल्पवयीन मूलगी वय १६ वर्ष ही दि. ०४/०९/२०२३ रोजी सकाळी ०५.३० वा. दरम्यान नेहमी प्रमाणे मुलांना शाळेत सोडण्याकरीता फिर्यादी हे गेले असता तेव्हा पत्नी व मुलगी ही घरीच हजर होती. फिर्यादी हे सायंकाळी ०६.०० वा. दरम्यान घरी परत आले तेव्हा मुलगी ही घरी दिसली नाही. फिर्यादी तिला बघण्याकरीता बस स्टॉप वर गेले असता ती तिथेही नव्हती. आजूबाजूच्या गावामध्ये तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला असता ती मिळून आली नाही कोणीतरी अज्ञात ईसमाने फिर्यादीच्या मुलीला फूस लावून पळवून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक चौधरी मो. नं. ७०३८८२२२०५ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. एम आय डी सी बोरी :–** अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील प्लॉट नं. १०, रिपेल्नटर इंटरनॅशनल प्रा. लि. Midc येथे दिनांक ०२/०९/२०२३ चे २३.०० वा. ते दिनांक ०३/०९/२०२३ चे ०५.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– देवेन्द्र रामाधार त्रिवेदी, वय ५२ वर्ष, ह. मु. प्लॉट नं. १० रिपेल्नटर इंटरनॅशनल प्रा. लि. Midc हे आपल्या कंपनीच्या परीसरात साहित्याची पाहणी करीत असतांना मशीन ऑपरेटर यांनी सांगीतले की, कंपनीच्या परीसरातील शेड मध्ये लहान मुलांचे खेळणी तयार करण्याकरीता लागणारे साहित्य मध्ये लोखंडी तुकडे लहान मोठे वजन अंदाजे ८० किलो किंमती २०००/– रू. व लोखंडी गोल आकाराचे प्लेट ०९ नग किंमती २५००/–रू. असा एकुण ४५००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक फौजदार विमल कुहीटे मो. क्र. ९०४९४ ७३४८१ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**